# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## भाजीपाला पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.**

१. दरपत्रक विहित नमुन्यात, सही व शिक्क्यासह स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि.०७/०१/२०२२ (सायं.५.००) पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक भाजीपाला पुरवठा करणे कामासाठी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा.

२. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

३. अनामत रक्कम रू.३,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

४. पुरवठादाराने दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराने १ वर्ष कालावधीत या कार्यालयाच्या मागणीप्रमाणे हंगामानुसार भाजीपाला पुरवठा करणे आवश्यक आहे.

५. भाजीपाल्याची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे. पुरवठा करावयाचा भाजीपाल्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकार | अ.क्र. | प्रकार | अ.क्र. | प्रकार | अ.क्र. | प्रकार | अ.क्र. | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बटाटे | ६ | फ्लॉवर | ११ | ढब्बू मिरची | १६ | कोथींबीर | २१ | लिंबू |
| २ | वांगी | ७ | कांदा | १२ | घेवडा | १७ | कडीपत्ता | २२ | अल्ले |
| ३ | टोमॅटो | ८ | भेंडी | १३ | गाजर | १८ | बीट | २३ | लसूण |
| ४ | काकडी | ९ | अळू | १४ | विडयाची पाने | १९ | पालक | २४ | दुधी भोपळा |
| ५ | दोडका | १० | कोबी | १५ | गवार | २० | चुका | २५ | हिरवी मिरची |

६. सदर पुरवठा कामाची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती, आधार कार्ड, नगरपालिका कराची पावती, पॅनकार्ड इत्यांदीच्या प्रती दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.

७. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. पुरविण्यात येणारे मालाची प्रत खराब असल्याचे आढळून आलेस, त्याबाबतची तपासणी करून खात्री केल्यानंतर पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

९. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही. तसेच मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण संत तुकाराम भवन, पंढरपूर आहे.

१०. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

११. दरपत्रकात नमुद सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१२. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २% आयकर कपात केली जाईल.

१३. सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१४. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१५. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१६. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजुर होईल, त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर**

**भाजीपाला पुरवठा कामाचे दरपत्रक**

**प्रति,**

**मा. कार्यकारी अधिकारी,**
**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर.**

**ठेकेदाराचे पूर्ण नाव व पत्ता :–** ———————————————————

———————————————————

**मोबाईल क्रं.:–** ———————————————————

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने भाजीपाला पुरवठा कामाची दि.२९/१२/२०२१ रोजीचे **दै. पंढरी संचार, सोलापूर** मध्ये प्रसिध्द झालेल्या दरपत्रकाच्या जाहिरातीप्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या भाजीपाल्याचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ.क्र. | तपशील | परिमाण | दर रू. | अ.क्र. | तपशील | परिमाण | दर रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | बटाटे | प्रती किलो | | १४ | अल्ले | प्रती किलो | |
| २ | वांगी | प्रती किलो | | १५ | दुधी भोपळा | प्रती किलो | |
| ३ | टोमॅटो | प्रती किलो | | १६ | हिरवी मिरची | प्रती किलो | |
| ४ | काकडी | प्रती किलो | | १७ | अळू | प्रती पेंडी | |
| ५ | दोडका | प्रती किलो | | १८ | विडयाची पाने | प्रती पेंडी | |
| ६ | कोबी | प्रती किलो | | १९ | गवार | प्रती किलो | |
| ७ | फ्लॉवर | प्रती किलो | | २० | ढब्बू मिरची | प्रती किलो | |
| ८ | भेंडी | प्रती किलो | | २१ | घेवडा | प्रती किलो | |
| ९ | पालक | प्रती पेंडी | | २२ | कांदा | प्रती किलो | |
| १० | चुका | प्रती पेंडी | | २३ | लसूण | प्रती किलो | |
| ११ | कोथींबीर | प्रती पेंडी | | २४ | गाजर | प्रती किलो | |
| १२ | कडीपत्ता | प्रती पेंडी | | २५ | बीट | प्रती किलो | |
| १३ | लिंबू | प्रती नग | | | | | |

वरील दर श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. सदर दराने १ वर्षे कालावधीत भाजीपाला पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.३,०००/– अनामत रकमेचा मुळ डी.डी. किंवा रोख अनामत रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे भाजीपाला पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

**दिनांक** / /२०२ **पुरवठाधारकाची सही व शिक्का**

**सोबत:** अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत, अनुभव प्रमाणपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड इ.